महाराष्ट्र शासन
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
3, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक:- 10036, मुंबई - 400 001
Website:- www.dvet.gov.in, E-mail:- desk9@dvet.gov.in, दुरध्वनी: 022-22620604/293/22621008

क्र:- 09/परीक्षा/प्रमाणपत्रे छपाई/2019/554
दिनांक :- 05/12/2019

प्रति,

विषय:- शिकाऊ उमेदवारी योजना आणि सीओई (बीबीबीटी आणि ॲडव्हान्स मोड्युल) योजने अंतर्गत उत्तीर्ण उमेदवारांची अंतिम प्रमाणपत्रे छपाई करण्यासाठी दरपत्रक आमंत्रित करणेबाबत.

कामाचे स्वरुप:
शिकाऊ उमेदवारी योजना आणि सीओई (बीबीबीटी आणि ॲडव्हान्स मोड्युल) योजने अंतर्गत उत्तीर्ण उमेदवारांची अंतिम प्रमाणपत्रे छपाई.

1. एकूण प्रती 30,000 (तीस हजार)
2. कागद: 220 GSM, A4 साईज, Preprinted स्वरुपात संचालनालयामार्फत संचालनालयाच्या वरिल पत्त्यावर पुरविण्यात येईल.
3. छपाई: वरीलप्रमाणे पुरविण्यात येणाऱ्या कागदावर एका बाजूस, एका रंगात मजकुर (Data) नमुद रकान्यात छपाई करणे.
4. मजकूर: संचालनालयामार्फत Microsoft Excel Sheet (.exl format) मध्ये English भाषेत मजकूर (Data) देण्यात येईल.
5. पुरवठा: संचालनालयाच्या वरील पत्त्यावर छपाई करणे वा छपाई करुन पुरविणे.
6. छपाई कालावधी: दिनांक 20 डिसेंबर 2019, सायंकाळी 5:00 वाजेपर्यंत.

वरिल छपाईचे काम करणेसाठी मोहरबंद व ठळक अक्षरांत दरपत्रक मागविण्यात येत आहेत. दरपत्रक, संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-400001 यांचेकडे पोहचविण्याची अंतिम मुदत दिनांक 12/12/2019 रोजी दुपारी 3:00 वाजेपर्यंत आहे. यानंतर संचालनालयात प्राप्त झालेली दरपत्रके विचारांत घेतली जाणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

1. दरपत्रक मोहरबंद पाकीटात असाव्यात व पाकीटावर "प्रमाणपत्र छपाईकरिता दरपत्रक" लिहावे व ज्या पत्र क्रमांकानुसार बोलविण्यात आलेले आहे त्या पत्राचा क्रमांक व दिनांक नमुद करण्यात यावा.
2. दरपत्रक स्विकृतीची वेळ किार्यालयीन वेळेत सकाळी 10:00 ते सायंकाळी 5:30 वाजेपर्यंत असून सादर केलेले दरपत्रक दिनांक 12/12/2019 रोजी सायंकाळी 4:00 वाजता, पाचव्या मजल्यावरील समिती कक्षात उघडण्यात येतील. त्यावेळेस आपण अथवा आपले प्रतिनिधी योग्य त्या ओळखपत्रासह हजर राहू शकतात. काही प्रशासकीय वा कार्यालयीन अडचणीमुळे दरपत्रक उघडणे शक्य झाले नाही तर लगतच्या नंतरच्या दिनांकास वा संचालनालयाच्या सोयीनुसार ठरवून दिलेल्या दिवशी उघडण्यात येतील.
3. दरपत्रकांत मालाचा दर वॅट व / वा इतर करांसह समाविष्ट करण्यात यावा.
4. पुरवठादाराकडे अधिकृत परवाना असणे आवश्यक आहे.

5. दरपत्रकातील सेलवर टॅक्स, स्थानिक टॅक्स किंवा इतर टॅक्स आकार आहेत किंवा नाही व आकार असल्यास त्याचे शेकडा प्रमाण काय राहील याचा स्पष्ट उल्लेख करावा.
6. सोबत पॅनकार्ड क्रमांक नमुद करण्यात यावा व त्यांची छायांकित प्रत देण्यात यावी.
7. दरपत्रक उघडण्याचे भाव कमीत कमी 01 वर्षाकरिता बंधनकारक राहतील.
8. मालाचा पुरवठा करण्यास जास्तीत जास्त किती कालावधी लागेल याचा स्पष्ट उल्लेख करावा.
9. सर्व सर्वसाधारणपणे ज्यांना मालाचा पुरवठा करणेबाबत आदेश देण्यात आले आहेत त्यांनी सेलटॅक्स क्रमांक व इन्कम टॅक्स क्लियरन्स प्रमाणपत्र सादर करणे अपेक्षित आहे.
10. पुरवठादाराने व्हॅट (VAT) / सीएसटी (CST) क्रमांक नमुद करण्यात यावा. तथापि, VAT /CST क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक देण्यात यावा.
11. उपरोक्त नमुद वस्तु व त्यांची संख्या यांचा वॉरंटी कालावधी वापरण्यात आल्याच्या दिनांकापासून 01 वर्षापर्यंत असेल, या कालावधीत निर्माण होणाऱ्या त्रुटी व इतर खोळंबा याची संपुर्ण निराकरण करणे आवश्यक राहील. उपरोक्त वस्तु सुरळीत राहण्यासाठी योग्य ती व्यवस्था कार्यान्वीत करणे व आवश्यक सुविधा पुरविणे बंधनकारक राहील.
12. उपरोक्त वस्तु पुरविण्याबाबतचे आदेश दिले असता त्याचे बील तीन प्रतीत या कार्यालयास सादर करावे. तसेच सदर मालाचा पुरवठा झाल्यानंतर सदर वस्तु चांगल्या स्थितीत व त्याची तपासणी झाल्यानंतर रक्कम मिळेल.
13. वस्तु योग्य प्रतिची किंवा समाधानकारक नसल्यास आणलेली वस्तू नाकरण्यात येईल, याची संपुर्ण जबाबदारी आपली राहील.
14. कोणतीही गोंधळात राहणारी किंवा वेगवेगळे अर्थ निघणारी बाब दरपत्रकात राहणार नाही, याची काळजी घ्यावी.
15. कोणतेही कारण न दर्शविता दरपत्रक रद्द करण्याचा किंवा न स्विकारण्याचा अधिकार संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-400 001 यांनी राखून ठेवलेला आहे.
16. दिलेल्या मुदतीत आपली दरपत्रक या कार्यालयास प्राप्त न झाल्यास वरील संपुर्ण अटी आपणांस मान्य नाहीत, असे समजण्यात येईल.

सदर दरपत्रक संचालनालयाच्या संकेत स्थळावर www.dvet.gov.in वर Download Section मध्ये उपलब्ध आहे.

(दि. अं. दळवी)
सहा. संचालक (तां.)